# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्यविद्यापीठ)

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

आ.जा./क्र./७०३/२०२६ दि. १०/०९/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख
संलग्नित महाविद्यालय व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:– विद्यापीठस्तरीय विद्यार्थी प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६–२७ मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त त्यांच्या विचार, कार्य व साहित्याचा प्रचार–प्रसार व्हावा या हेतूने ''विद्यापीठस्तरीय विद्यार्थी प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६–२०२७'' चे आयोजन क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन केंद्र व प्रबोधन पर्व, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

**स्पर्धेचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे:**

**स्पर्धेचा दिनांक:** रविवार, १८ ऑक्टोबर २०२६

**परीक्षा केंद्रे:** गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर

**पात्रता:** विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी

**स्पर्धेची पध्दत:** १०० गुणांची वस्तुनिष्ठ (MCQ) प्रश्न पध्दती

**स्पर्धा नोंदणी:** पूर्णत: मोफत (कोणतेही नोंदणी शुल्क नाही)

**संदर्भ साहित्य (पुस्तके) शुल्क:** रू. १००/– (प्रबोधन पर्व तर्फे 'शेतकऱ्यांचा असूड' व 'सार्वजनिक सत्यधर्म' ही पुस्तके अभ्यासासाठी दिली जातील)

**अभ्यासक्रम:**

१) महात्मा ज्योतिराव फुले लिखित पुस्तके – 'शेतकऱ्यांचा असूड'
२) 'सार्वजनिक सत्यधर्म'
३) सामाजिक ज्ञान

**नोंदणी कालावधी:** २० सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६

**नोंदणी प्रक्रिया:**

विद्यार्थ्यांनी खाली दिलेल्या गुगल फॉर्म लिंकवर जाऊन २० सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान आपली विनामूल्य नोंदणी पूर्ण करून साहित्य प्राप्त करून घ्यावे.

**अधिकृत नोंदणी लिंक:** https://forms.gle/uQi79w2Q4qkc78nn6

या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेत सहभागी करून घेण्यासाठी महाविद्यालय स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धेची माहिती देऊन त्यांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे.

स्दर उपक्रम हा महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचार व सामाजिक कार्याची ओळख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा लक्षणीय व उत्स्फूर्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी महाविद्यालयाने विशेष प्रयत्न करावेत, ही विनंती.

आपल्या महाविद्यालयाकडून या उपक्रमास सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा आहे.

Rajani Wadhai

Digitally signed by Rajani Wadhai
Date: 2026.09.10 12:47:14 +05'30'

(डॉ. रजनी वाढई)
समन्वयक
क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले अध्यासन
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

अंतर्गत

## महात्मा ज्योतिबा फुले अश्गत्तासन केंद्र

## व प्रबोधन पर्व चंद्रपूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

प्रबोधन पर्व
चंद्रपूर
विचार • संवाद • परिवर्तन




महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त

# विद्यापीठस्तरीय विद्यार्थी प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६-२०२७

महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले हे आधुनिक भारतातील थोर समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे प्रणेते, शेतकरी हितचिंतक आणि सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या विचारांचा विद्यार्थ्यामध्ये प्रसार व्हावा, सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांबाबत जनजागृती व्हावी तसेच विद्यार्थ्यामध्ये वाचन, अध्ययन व संशोधनाची आवड निर्माण व्हावी या उदेशाने त्यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त त्यांच्या शैक्षणिक कार्य, सामाजिक समता, स्त्री शिक्षण, शेतकरी कल्याण, सत्यशोधक विचार आणि मानव मुक्ती कार्याचा परिचय विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी **“महात्मा ज्योतिराव फुले : जीवन व कार्य”** या विषयावर विद्यापीठस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित येत आहे.

**चला, फुलेंच्या विचारांनी प्रेरित होऊया...**
**शिक्षित व्हा, संघटित व्हा, संघर्ष करा !**

## स्पर्धेची उद्दिष्टे

1. विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन, कार्य व विचारांची माहिती करून देणे व प्रसार करणे.
2. सामाजिक समता, बंधुता, स्त्री शिक्षण व सामाजिक न्यायाच्या मूल्यांचा प्रसार करणे.
3. विद्यार्थ्यामध्ये अभ्यास, वाचन व स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणे.
4. महात्मा फुले यांच्या साहित्याचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन देणे.
5. संविधानिक मूल्यांबाबत विद्यार्थ्यामध्ये जागरूकता निर्माण करणे.
6. विद्यापीठाशी सलग्न सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.

**“सत्यशोधकाचा विचार हा समाजपरिवर्तनाचा मूलाधार आहे.”**
— महात्मा ज्योतिराव फुले

## स्पर्धेचे स्वरुप

1) १८/१०/२०२६ रोज रविवारला गडचिरोली जिल्ह्यात विविध परीक्षा केंद्रावर प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात येईल.
2) १८/१०/२०२६ रोज रविवारला चंद्रपूर जिल्ह्यात विविध नियोजित केंद्रावर प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात येईल.
3) **आयोजक :** १) प्रबोधन पर्व २०२६ चंद्रपूर,
   २) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महात्मा ज्योतिराव फुले अध्यासन केंद्र)
4) **सहभागी :** विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी
5) **स्पर्धेची पद्धत :** १०० गुणांची वस्तूनिष्ठ प्रश्न पद्धती
6) **अध्यासक्रम :** महात्मा ज्योतिराव फुले लिखित पुस्तके
   १) शेतकऱ्यांचा असुड   २) सार्वजनिक सत्यधर्म
   ३) सामाजिक ज्ञान

## स्पर्धेचा दिनांक

**१८ ऑक्टोबर, २०२६**
(महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी वर्षानिमित्त)

## नोंदणीची तारीख

**२० सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६** दरम्यान विद्यार्थी दिलेल्या लिंक वर नोंदणी करून आपले साहित्य प्राप्त करून घ्यावेत.

**नोंदणी लिंक :**
https://forms.gle/uQi79w2Q4qkc78nn6

**साहित्य शुल्क :**
₹ १००/-
(शेतकऱ्यांचा असुड, सार्वजनिक सत्यधर्म ही पुस्तके प्रबोधन पर्व तर्फे देण्यात येईल)

## बक्षिसे

### गडचिरोली जिल्ह्याकरिता

- प्रथम पारितोषिक    रक्कम रोख १५०००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- द्वितीय पारितोषिक    रक्कम रोख १००००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- तृतीय पारितोषिक    रक्कम रोख ५०००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १० विद्यार्थ्यास रक्कम रोख १०००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- सर्व सहभागींस सहभाग प्रमाणपत्र

### चंद्रपूर जिल्ह्याकरिता

- प्रथम पारितोषिक    रक्कम रोख १५०००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- द्वितीय पारितोषिक    रक्कम रोख १००००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- तृतीय पारितोषिक    रक्कम रोख ५०००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १० विद्यार्थ्यांना रक्कम रोख १०००/- व सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- सर्व सहभागींस सहभाग प्रमाणपत्र